**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** येरवडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0416 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/06/2024 10:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)इ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(ब) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 21/02/1981
**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/03/2014
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/06/2024 **Time (वेळ):** 10:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2024 10:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** डी-5/8, हम्र्स हेरीटेज -11, ,शास्त्रीनगर, येरवडा, पुणे, व इतर ठिकाणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** येरवडा
**District(State) (जिल्हा(राज्य)):** पुणे शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.प्रविण निंबाळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, ला प्र वि पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, ला प्र वि पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.दादाभाऊ सोनु तळपे | | | 1. डी-5/8, हम्र्स हेरीटेज -11, ,शास्त्रीनगर, येरवडा, पुणे, येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.कल्पना दादाभाऊ तळपे | | | 1. डी-5/8, हम्र्स हेरीटेज -11,, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे, येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद दिनांक-29/06/2024

मी प्रविण नारायण निंबाळकर, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग पुणे रा.क्वीन्स गार्डन कॅम्प, पुणे समक्ष सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिनांक 11/04/2022 रोजी पासुन कार्यरत आहे.
श्री. दादाभाऊ सोनु तळपे, तत्कालीन उपसंचालक, भुमी अभिलेख, नागपुर, वर्ग -1, सध्या रा.डी-5/8, हम्रस हेरीटेज -11, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे 411006 यांचेविरूध्द तक्रारदार अमरेंद्र सिंग वर्मा यांना त्यांचे पक्षकाराचे बाजुने निकाल देणे करीता 5,00,000/- रूपये लाचेची मागणी करून, नगर भुमापन कार्यालयातील शिपाई श्री. भालचंद्र गलांडे यांचे मार्फतीने स्विकारली होती. त्यासंदर्भात त्यांचेविरूध्द भ्र.प्र. अधिनियम -1988 चे कलम 7, 12, 13(1)(ड) सह 13(2) प्रमाणे सिताबर्डी पोलीस स्टेशन नागपुर शहर येथे गु.र.नं. 3348/2014 अन्वये दिनांक 27/02/2014 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.
दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने श्री. दादाभाऊ सोनु तळपे, यांचे नागपुर येथील गंगोत्री अपार्टमेंट फ्लॅट नंबर सी -305, म्हाडा कॉलनी, अमरावती रोड, नागपुर येथील तसेच डी-5/8, हम्रस हेरीटेज -11, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे 411006 येथील निवासस्थानांच्या झडत्या घेण्यात आलेल्या होत्या. घरझडत्यामध्ये मिळून आलेल्या मालमत्तेच्या आधारे श्री. दादाभाऊ सोनु तळपे यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मा. महासंचालक सो, ला.प्र.वि., म.रा., मुंबई यांच्या कार्यालयाकडील जा.क्र. ईओ/ तळपे/ नागपुर/ 2014/ 7420, दिनांक 20/05/2014 व जा.क्र. ईओ तळपे/ नागपुर/ पुणे/2014/9031, दिनांक 02/06/2014 अन्वये मा. पोलीस अधिक्षक सा, ला.प्र.वि., पुणे यांना दिलेले होते.त्याप्रमाणे मा.पोलीस अधिक्षक सो,ला.प्र.वि., पुणे यांच्या कार्यालयाकडील जा.क्र. चौ(उ)/123/पुणे/2014/1982, दिनांक 11/06/2014 अन्वये तत्कालीन चौकशी अधिकारी श्री.सुनिल शेटे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि., पुणे यांना दिलेले होते.त्यांनी तसेच तत्कालीन चौकशी अधिकारी श्रीमती अर्चना बोदडे,पोलीस निरीक्षक,तसेच श्रीमती अलका सरग ,पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली.तदनंतर पुढील उघड चौकशी आम्ही केलेली आहे.
तत्कालीन चौकशी अधिकारी श्री.सुनिल शेटे,पोलीस उपअधिक्षक, श्रीमती अर्चना बोदडे, पोलीस निरीक्षक तसेच श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक, यांनी गैरअर्जदार यांचे घेतलेले जबाब व प्राप्त केलेली कागदपत्रे व अहवाल यावरून प्रस्तुत उघड चौकशी मध्ये गैरअर्जदार श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांचा दिनांक दि.21/02/1981 ते दि. 31/03/2014 रोजी पर्यंत परिक्षण कालावधी ग्राह्य धरूण उत्पन्न, खर्च व मालमत्तेची मांडणी करून उघड चौकशी प्रकरणाचा अहवाल मा.वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला होता.सदर उघड चौकशी प्रकरणात गैरअर्जदार श्री. दादाभाऊ सोनु तळपे व त्यांच्या कुटूंबीयांचे खालील प्रमाणे त्यांची एकुण ज्ञात उत्पन्न, खर्च, मालमत्ता खालील प्रमाणे असल्याचे निष्पन्न झाले आहे.
गैरअर्जदार श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांना परिक्षण कालावधीमध्ये एकुण 1,10,07,010/- रूपये उत्पन्न मिळालेले असुन, त्यांची पत्नी सौ. कल्पना दादाभाऊ तळपे यांना परिक्षण कालावधीमध्ये एकुण 42,13,456/- रूपये उत्पन्न मिळालेले आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार श्री.तळपे व त्यांची पत्नी सौ.कल्पना या दोघांना एकत्रिपणे परिक्षण कालावधीमध्ये एकुण 1,52,20,466/- रूपये उत्पन्न मिळालेले आहे.
गैरअर्जदार श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांचा परिक्षण कालावधीमध्ये एकुण 74,64,538/- रूपये खर्च झालेला असुन, त्यांची पत्नी सौ. कल्पना दादाभाऊ तळपे यांचा परिक्षण कालावधीमध्ये एकुण 12,03,731/- रूपये खर्च झालेला आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार श्री. तळपे व त्यांची पत्नी सौ.कल्पना या दोघांचा एकत्रिपणे परिक्षण कालावधीमध्ये एकुण 86,68,269/- रूपये खर्च झालेला आहे.
गैरअर्जदार श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांनी परिक्षण कालावधीमध्ये एकुण 50,40,131/- रूपयांची मालमत्ता

संपादित केलेली असुन, त्यांची पत्नी सौ. कल्पना दादाभाऊ तपे यांनी परिक्षण कालावधीमध्ये एकुण 43,64,607 /- रूपयांची मालमत्ता संपादित केली आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार श्री. तळपे व त्यांची पत्नी सौ.कल्पना या दोघांचा एकत्रिपणे परिक्षण कालावधीमध्ये एकुण 94,04,738/- रूपयांची मालमत्ता संपादित केलेली आहे.

अशा प्रकारे प्राप्त माहीतीच्या अधारे त्यांची उघड चौकशी करण्यात आली असुन त्यांचे उक्त नमुद परिक्षण कालावधीत त्यांचे सर्व ज्ञात स्त्रोतपासून मिळणारे एकूण उत्पन्न 1,52,20,466/- रुपये होत असुन त्यांचा एकुण खर्च 86,68,269/- रूपये इतके आहे. व गैरअर्जदार व त्यांच्या कुटूंबियांची मालमत्ता रुपये 94,04,738/- रुपये इतकी होत आहे.

गैरअर्जदार व त्यांच्या कुटूंबियांचा एकुण खर्च व संपादीत मालमत्ता यामधुन त्यांचे एकुण उत्पन्न वजा जाता त्यांचेकडे 28,52,541/- रुपये जास्तीच्या रक्कमेची अपसंपदा मिळुन आली असुन त्याची टक्केवारी पाहता ती 18.74 % इतकी होत आहे. सदर परिक्षण कालावधी मधील श्री. दादाभाऊ सोनु तळपे यांचे उत्पन्न, खर्च व मालमत्ता बाबत माहिती प्राप्त करुन तसेच श्री. दादाभाऊ तळपे व त्यांचे कुटंबीय यांना पुरेशी व वाजवी संधी देवुन त्यांनी हजर केलेल्या कागदपत्रावरुन त्यांचे उत्पन्न, खर्च व मालमत्ता बाबत अवलोकन केलेवर श्री. दादाभाऊ तळपे व त्यांच्या कुटूंबियांची अपसंपदा दिसुन आल्याने त्याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करुन मा. उपआयुक्त/पोलीस अधीक्षक सो, ला.प्र. वि. पुणे यांचे मार्फतीने मा. महासंचालक ला.प्र.वि.म.रा. मुंबई यांना दिनांक 14/03/2024 रोजी सादर केला. त्या अहवालास अनुसरुन मुख्यालयाकडुन क्र. चौ.(उ)/123/नागपुर-पुणे/वर्ग -1/2014/2024 -6535, दि. 25/06/2024 अन्वये लोकसेवक श्री.दादाभाऊ तळपे यांनी भ्रष्ट मार्गाने अपसंपदा धारण केली असल्याने व त्यांची पत्नी सौ.कल्पना दादाभाऊ तळपे यांनी अपप्रेरणा व सहाय्य केले असल्याने त्यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

तरी लोकसेवक श्री.दादाभाऊ सोनु तळपे वय 62 वर्षे, यांनी भ्रष्ट मार्गाने त्यांचे व त्याची पत्नी सौ.कल्पना दादाभाऊ तळपे, वय 58 वर्षे, सर्व राहणार डी-5/8, हम्र्स हेरीटेज -11, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे 411006 यांनी त्यांचे नावे एकत्रितपणे एकुण 28,52,541/- रुपये जास्तीच्या रक्कमेची अपसंपदा मिळुन आली असुन त्याची टक्केवारी पाहता ती उत्पन्नाच्या तुलनेत 18.74 ऽ इतकी जास्त असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. गै.अ. श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांचे सदरचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 13 (1) (ई) व 13 (2) तसेच सुधारित भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 2018 चे कलम 13 (1) (ब) व 13 (2) प्रमाणे गुन्हा होत असुन त्यांचेविरुध्द माझी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.तसेच गैरअर्जदार यांची पत्नी सौ.कल्पना दादाभाऊ तळपे यांनी नमुद अपसंपदा संपादीत करण्यास गै.अ. श्री.दादाभाऊ सोनु तळपे यांना अपप्रेरणा व सहाय्य केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असुन त्यांचे सदरचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयाचे वर नमुद कलमाचे कक्षेतील अपराधास सहाय्य करणारे असल्याने माझी त्यांचे विरुध्द भा.दं.वि. कलम 109 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी वाचून पाहिली असता ती माझ्या सांगणे प्रमाणे बरोबर आहे. ---दाखल अधिकारी-सपोफौ भगवान काळे येरवडा पो .स्टे पुणे शहर---तपासी अधिकारी-श्री.श्रीराम विष्णु शिंदे,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA DHAIRYASHEEL SHELKE(I (Inspector)) / PBMH72874 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
येरवडा पोलीस स्टेशन,

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA DHAIRYA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH72874